



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २९४ वा ❑ शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## पोलीस दलाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रीद वाक्य सुरक्षा नागरिकांच्या सुरक्षेची धुरा पोलिस खात्रीलायकी प्रतिष्ठा पुन्हा एकदा धोक्यात आली आहे.

हे ब्रीदवाक्य महाराष्ट्र पोलीस दलाचे ध्येय आणि उद्दिष्ट दर्शवते, ज्यात कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे आणि जनतेला भयमुक्त वातावरण देणे हे महत्त्वाचे आहे. मात्र आज पोलिसांमुळेच भय निर्माण होत आहे.पोलिस प्रशासनातून सध्या एक मोठा वादग्रस्त प्रकार समोर आला असून त्यामुळे प्रचंड खळबळ उडाली आहे. रामचंद्र राव यांच्या कार्यालयातील कथित आपत्तिजनक वर्तनाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर त्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओंमध्ये रामचंद्र राव हे पोलीस गणवेशात त्यांच्या कार्यालयात वेगवेगळ्या महिलांसोबत अतिशय अयोग्य वर्तन करताना दिसत असल्याचा दावा केला जात आहे.या दृश्यांमध्ये ते महिलांना मिठी मारताना आणि किस करताना दिसत असल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे, हे सर्व प्रसंग त्यांच्या अधिकृत कार्यालयातच घडल्याचा आरोप आहे. वेगवेगळ्या वेळेस आणि वेगवेगळ्या कपड्यांमध्ये महिला दिसत असल्याने हे व्हिडिओ अनेक प्रसंगी गुप्तपणे चित्रीत करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, या प्रकरणात जबरदस्ती किंवा अत्याचाराचे थेट आरोप अद्याप करण्यात आलेले नाहीत.

या आधी देखील राजस्थान पोलिस सेवेतील एक अधिकारी आणि एका महिला कॉन्स्टेबलचा अश्लील व्हिडिओ व्हायरल झाला. या व्हिडिओनंतर पोलिस प्रशासनाने विभागीय कारवाई केली आहे. कथित नैतिक गैरवर्तन केल्याप्रकरणी पोलीस विभागाने दोघांना निलंबित केलं आहे. अजमेरमधील ब्यावरचे सीओ हिरालाल सैनी आणि जयपूरमध्ये तैनात एक महिला कॉन्स्टेबल यांचा अश्लील व्हिडिओ व्हायरल झाला होता. या प्रकरणी महिला कॉन्स्टेबलच्या पतमीने पोलिसात तक्रार केली होती, अशी माहिती पोलिस मुख्यालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

आयपीएस रामचंद्र राव हे तेच अधिकारी आहेत, ज्यांची मुलगी आणि अभिनेत्री रान्या राव हिला कर्नाटकातील सर्वात मोठ्या सोन्या तस्करी प्रकरणात अटक करण्यात आली होती. रान्या ही रामचंद्र यांची सावत्र मुलगी आहे. मार्च २०२५ मध्ये दुबईहून मुंबईत येत असताना अभिनेत्रीला अटक करण्यात आलं आणि तिच्याकडून १४.८ किलो सोनं जप्त करण्यात आलं. अटकेनंतर, जेव्हा एजन्सींनी बेंगळुरूमधील लव्हेल रोडवरील तिच्या निवासस्थानी छापा टाकला तेव्हा तेथूनही मोठ्या प्रमाणात मालमत्ता जप्त करण्यात आली.

अधिकाऱ्यांनी रान्या रावच्या घरातून अंदाजे २.०६ कोटी किमतीचे सोने आणि दागिने आणि २.६७ कोटी रोख जप्त केले. प्रकरण आणखी वाढले जेव्हा, अभिनेत्रीचे सावत्र वडील आणि वरिष्ठ आयपीएस अधिकारी रामचंद्र राव यांच्यातील कथित संबंधांबद्दल प्रश्न उपस्थित झाल्यावर, राज्य सरकारने त्यांना रजेवर पाठवले. पण, पाच महिन्यांनंतर सरकारी नोकरीवर रामचंद्र पुन्हा दाखल झाले. आता अश्लील व्हिडीओ प्रकरणी त्यांना निलंबित करण्यात आलं आहे.

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यातून एक खळबळ उडवणारी बातमी समोर येत आहे. एका अश्लील व्हायरल व्हिडिओमुळे प्रशासन आणि पोलीस यंत्रणेच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सोशल मीडियावर एक अश्लील व्हिडिओ व्हायरल झाला. या व्हिडिओत काही महिलांनी अश्लील नृत्य सादर केले. दरम्यान, या कार्यक्रमावेळी उपविभागीय अधिकारी (एसडीओ) आणि पोलीस अधिकाऱ्यांची उपस्थिती दिसून आली. पोलीस उपस्थित राहूनही त्यांनी या कार्यक्रमावर आक्षेप घेतलेला नाही. या प्रकरणी प्रशासनाने कठोर कारवाई केली असून, एका एसडीओला त्यांच्या पदावरून हटवण्यात आले. तर, तीन पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असल्याची माहिती आहे. महिलांच्या या अश्लील नृत्याचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे.

प्रशासनातील अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी कसे वागावे, याबाबत काही मार्गदर्शक तत्वे व नियम आहेत.त्याचे पालन प्रत्येक अधिकाऱ्यांनी व कार्यालयांनी कर्मचाऱ्यांनी करायला पाहिजे.

प्रशासनातील अधिकाऱ्यांनी शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे () आणि सूचनांचे पालन करणे अनिवार्य आहे, कारण ते कायदे, नियम आणि धोरणे यांची अंमलबजावणी करतात; या तत्त्वांमुळे कामात सुसूत्रता येते, नागरिकांना न्याय मिळतो, तसेच सार्वजनिक कल्याण साधले जाते, जसे की शासनाच्या धोरणांचे उद्दिष्ट कल्याणकारी राज्य निर्माण करणे आहे. यित्व: या तत्त्वांमुळे अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होते आणि त्यांच्या कामात उत्तरदायित्व येते, जसे की सोशल मीडिया नियमांमधील तक्रार निवारण यंत्रणा. आदी मात्र रक्षकच भक्ष व्हायला लागले तर..न्याय कोणाला मागायचा.अधिकारी व कर्मचारी नको त्या हरकती करतात.प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्तीचा अधिकार आहे.मात्र त्यावरील मर्यादांचे पालन प्रत्येकांना करायचे असतात.भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (१) (अ)मध्ये अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. कलम १९ (२)मध्ये या अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर एकूण सात निर्बंध नमूद आहेत. या निर्बंधापैकी एक म्हणजे ‘ ’, अर्थात श्लील अथवा नैतिकता हे होत. म्हणजेच जी जी अभिव्यक्ती अश्लील किंवा अनैतिक असेल, त्यावर बंदी टाकण्याचे अधिकार शासनास आहेत. अर्थातच अशी बंदी शासनयंत्रणांनी लादली, तरी तिला न्यायालयात आव्हान देता येते. कर्नाटक सरकारने योग्य तो निर्णय घेतला व पोलिस अधिकाऱ्याला निलंबित केले.

पोलिस विभागातील अधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी असते.

पोलीस अधिकाऱ्यांवर कायदा-सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारी रोखणे व तपासणे, नागरिकांचे संरक्षण करणे, आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे अशा अनेक मोठ्या जबाबदाऱ्या असतात, ज्यामध्ये निष्ठा, कर्तव्यनिष्ठा, आणि नागरिकांप्रति सहानुभूती महत्त्वाची असते.

# हिंदू संघटनेचा एक ऐतिहासिक टप्पा

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : हिंदू धर्माचे स्वरूप अत्यंत अथांग आणि व्यापक आहे. यामध्ये शेकडो पंथ, मतप्रवाह आणि संप्रदायांचा समावेश होतो. जगातील जवळपास सर्वच देशांमध्ये हिंदू समाज विखुरलेला आहे. या विखुरलेल्या समाजाला संघटित करण्यासाठी आणि त्यांच्यात समन्वय प्रस्थापित करण्यासाठी २९ जानेवारी १९६४ रोजी, श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभ मुहूर्तावर मुंबईत विश्व हिंदू परिषदेची (विहिप) स्थापना करण्यात आली.

संस्थेच्या स्थापनेनंतर, पहिले विश्व हिंदू संमेलन प्रयागराज येथे महाकुंभाच्या पवित्र काळात घेण्याचे निश्चित झाले. हे ऐतिहासिक संमेलन २२ जानेवारी १९६६ रोजी सुरू झाले आणि २४ जानेवारी रोजी त्याची सांगता झाली.

भारतात प्राचीन काळी अशी संमेलने होत असत, जिथे देश, धर्म आणि समाजाशी संबंधित विषयांवर मंथन केले जाई. या संमेलनांच्या निमित्ताने साधू-संतांचा लाखो गावांशी आणि कोट्यवधी लोकांशी संपर्क येत असे, ज्यामुळे श्रेष्ठ विचार समाजात वेगाने पसरत असत. मात्र, परकीय आक्रमकांच्या काळात या संमेलनांचे स्वरूप मर्यादित झाले होते. हीच गौरवशाली परंपरा पुन्हा जिवंत करण्यासाठी प्रयागराजमध्ये या संमेलनाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे, प्रयागराजमध्ये अशा प्रकारचे शेवटचे मोठे संमेलन सुमारे १,४०० वर्षांपूर्वी सम्राट हर्षवर्धनाच्या काळात झाले होते.




– दिग्गज मान्यवरांची उपस्थिती

या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे चारही पीठांचे शंकराचार्य आणि सर्व प्रमुख पंथ-संप्रदायांचे धर्माचार्य एकाच व्यासपीठावर आले होते. याशिवाय समाजजीवनातील अनेक मान्यवरही उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने:

– उत्तर प्रदेशचे राज्यपाल विश्वनाथ दास, बिहारचे राज्यपाल अनंत शयनम अयंगर आणि बंगालचे राज्यपाल डॉ. कैलाशनाथ काटजू.

– नेपाळचे पंतप्रधान तुलसीगिरी, फिजीचे आचार्य रामनरेश आणि लंडनचे एफ.सी. सोंधी.

– संत तुकडोजी महाराज, स्वामी चिन्मयानंद आणि स्वामी विश्वेशतीर्थ यांसारख्या महान विभूती.

भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन, नेपाळचे नरेश आणि तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांनी या संमेलनासाठी लेखी शुभेच्छा संदेश पाठवले होते. तसेच ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, जर्मनी, जपान आणि दक्षिण-पूर्व आशियातील विद्वानांनीही या उपक्रमाचे स्वागत केले.

– संमेलनाचे स्वरूप आणि चर्चा

या संमेलनात भारताच्या सर्व राज्यांसह आफ्रिका, श्रीलंका, मॉरिशस, फिजी, अमेरिका आणि थायलंड यांसारख्या देशांतून प्रतिनिधी आले होते. सुमारे १२,००० प्रतिनिधींच्या निवासाची व्यवस्था तंबूंच्या नगरीत करण्यात आली होती. प्रत्येक सत्रात २५,००० हून अधिक लोक उपस्थित राहत, तर खुल्या अधिवेशनात ही संख्या ७५,००० पर्यंत पोहोचली होती.

संमेलनादरम्यान अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली:

१. युगानुकूल आचारसंहिता: हिंदू समाजासाठी काळाला अनुरूप अशी नवीन आचारसंहिता असावी, यावर भर देण्यात आला.

२. धर्मांतर आणि गोवंश रक्षा: सक्तीचे धर्मांतर आणि गोवंश हत्या यांसारख्या गंभीर प्रश्नांवर मंथन झाले.

३. सांस्कृतिक उत्थान: मंदिरांचा जीर्णोद्धार आणि संस्कृत भाषेचा प्रसार यावर सर्वांनी संमती दर्शवली. या तीन दिवसांत एकूण ११ ठराव सर्वसंमतीने मंजूर करण्यात आले.

या संमेलनाच्या यशामागे विश्व हिंदू परिषदेचे सरचिटणीस दादासाहेब आपटे यांचे अथक परिश्रम होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक श्री गोळवलकर गुरुजी हे या संमेलनाचा आत्मा होते. जेव्हा कधी ज्येष्ठ संतांमध्ये वैचारिक मतभेद निर्माण होत, तेव्हा गुरुजी आपल्या नम्रतेने आणि पांडित्याने सर्वांचे समाधान करून सर्वसहमती घडवून आणत असत.

या पहिल्या विश्व हिंदू संमेलनाने केवळ भारतातीलच नव्हे, तर संपूर्ण जगातील हिंदू समाजात एक नवीन चैतन्य जागृत केले आणि संघटनेचा एक प्रभावी संदेश जागतिक स्तरावर पोहोचवला.

(संदर्भ – वि.हि.प की ४२ वर्षीय विकास यात्रा/३५, रघुनंदन प्रसाद शर्मा)

# प्रेरणा महाविद्यालयात युवा चेतना स्पर्धा परीक्षा शिबिर संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

गडचांदूर : वाढती स्पर्धा लक्षात घेता ग्रामीण भागातील होतकरू तरुणांना योग्य दिशा देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना परीक्षाभिमुख बनविण्यासाठी स्पर्धा परीक्षा शिबिराचे आयोजन स्वामी विवेकानंदांच्या जयंती प्रित्यर्थ प्रेरणा प्रशासकीय महाविद्यालयात करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन गडचांदूर नगर परिषदेचे उपाध्यक्ष मा. संजयजी मेंढी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रेरणा कॉलेजचे उपाध्यक्ष मा. बालाजीभाऊ पुरी होते. युवा उद्योजक नगरसेवक तुषार बावणे यांनी विद्यार्थ्यांना परिश्रमाशिवाय पर्याय नसल्याचे मार्गदर्शन केले. शिबिरात प्रामुख्याने विजय अकॅडमीचे माधव चलवाड, रामप्रसाद गांगर्डे, टाटा समूह शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर येथील मा. प्रदीप चामले, तेजस्विनी कवठे जालना, प्रा दुर्गावती खुबाळकर, प्रा.छायाताई गायकवाड, प्रा. चेतना येरणे, प्रा.विवेक पाल, अरविंद मुसने, प्रा.धनश्री चिताडे, प्रा.बाळू उमरे, दिवाकर राऊत, मा.रमेश राठोड ,प्रा. दुर्गावती खुबाळकर, प्रा. छायाताई गायकवाड यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, परीक्षेचे वेळापत्रक, अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षेचे नियोजन कसे केले पाहिजे, सातत्य आणि प्रामाणिकपणा कसा महत्त्वाचा आहे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.





विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन माधव चलवाड यांनी प्रश्नोत्तराच्या तासात केले. दररोज विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्याकरिता गृहपाठ देण्यात आला. वास्तविकतेचे भान ठेवत विद्यार्थ्यांनी परीक्षाभिमुख बनत स्मार्टवर्क करण्याविषयी मार्गदर्शन मान्यवरांनी केले.

मार्गदर्शक श्री. रमेशजी राठोड यांनी बदलत्या परीक्षा पद्धतीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, ‘‘केवळ कष्ट करून चालणार नाही, तर बदलत्या परीक्षा पद्धतीनुसार योग्य रणनीती आखणे ही यशाची गुरुकिल्ली आहे.‘‘ विद्यार्थ्यांनी अभ्यासातील सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास यश निश्चित असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

तर प्रा. अरविंदजी मुसने यांनी ‘‘विद्यार्थ्यांच्या मनात प्रशासकीय सेवेबद्दल असलेली भीती दूर करून त्यांना आत्मविश्वासाने सज्ज करणे हाच या शिबिराचा मुख्य हेतू आहे. भविष्यातही अशा प्रकारचे मार्गदर्शक उपक्रम राबवण्यास महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मार्गदर्शन करताना प्रा. चेतना कामडी- येरणे म्हणाल्या की, ‘‘कसोशीने परिश्रम केल्यास यश नक्की मिळते. स्पर्धेच्या युगात तयारी करताना विद्यार्थ्यांनी अद्यावत ज्ञान आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. दैनंदिन वर्तमानपत्रातील महत्त्वपूर्ण नोंदी घेत स्वतःला सतत अपडेट ठेवले, सातत्य राखले आणि विषयानुसार नियोजनबद्ध अभ्यास केला तर स्पर्धा परीक्षेत यश निश्चित मिळते.

पुढे त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, विविध विषयांचा अभ्यास कसा करावा आणि अभ्यासातील सातत्य कसे टिकवावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.युवा चेतना शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयी सखोल व उपयुक्त मार्गदर्शन प्रा बाळू उमरे, प्रा. विवेक पाल या मान्यवरांनी केले.

या सहा दिवसीय शिबिरात स्पर्धा परीक्षेचा आवाका, वेळेचे अचूक नियोजन आणि मुलाखतीची तयारी यांसारख्या विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. दुर्गावती खुबाळकर मॅडम यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. छाया गायकवाड यांनी मानले.शिबिराच्या यशस्वीतेसाठी यश ताकसांडे, कुंजन शेंडे, अजय कोटनाके, अर्चना मुत्यालवार, रविंद्र पवार, विक्रम थेरे, साक्षी गुरनुले, तृप्ती ठाकरे, राखी पोटदुखे, सलोनी उईके, करीना परचाके, तन्वी चहाकाटे आदी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.






## जात्यावरच्या ओव्या......

सण सकरातीचा
वाटा तिळगुळ
हृदय कराव मोकळ
नही करू मुळमुळ ||४६२||

सण गोड बोलायचा
याला म्हणे सकरात
तिळगुळाचा सुवास
दरवळला गावात ||४६३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## हुशार बबू माकड




**ज्योतिर्मय साहित्य**

सगळी माकडं आनंदाने तलावातलं थंडगार पाणी प्यायला. पाणी पिऊन झाल्यावर सगळी माकडं जवळच असलेल्या जांभळीच्या झाडावर चढली. झाडावर भरपूर गोड जांभळं लागलेली होती.

या टोळीत बबू नावाचं एक छोटं माकड होतं. बबू खूप हुशार होता पण तसाच खोडकरही...! जांभळीच्या झाडाची एक फांदी तलावावर झुकली होती आणि त्या फांदीला भरपूर जांभळं लागली होती. पण ती फांदी नाजूक आणि कमजोर होती.

''अरे बबू, फार टोकाला जाऊ नकोस!''

''ती फांदी कमजोर आहे!''

सगळी माकडं त्याला सांगत होती.

पण बबू कुठला ऐकतोय ?

''मला फांदीच्या टोकावरची ती मोठी, टपोरी गोड जांभळं हवीत!'' असं म्हणत तो झाडाच्या अगदी टोकावर गेला.

आणि सगळ्यांना जी भीती होती तीच खरी ठरली. मोठ्याने धपकन असा आवाज झाला फांदी तुटली आणि बबू थेट तलावात पडला!



तलावात चिखल होता, तुटलेल्या फांद्या होत्या.

बबू प्रचंड घाबरला.

तो हातपाय हलवत होता. तलावाच्या बाहेर येण्यासाठी त्याची धडपड सुरू होती.

''अरे बापरे! आता काय करायचं?''

खूप हातपाय मारून झाल्यावर तो कसाबसा एका मोठ्या दगडापर्यंत जाऊन पोहोचला.

तो खूप थकला होता. दम लागला होता.

थोडावेळ तो शांत बसला आणि विचार करू लागला. मग त्याला आईचे शब्द आठवले. आई त्याला सांगायची ''बबू अरे, कोणताही कठीण प्रसंग आला तरी घाबरायचं नाही. थोडा वेळ शांत बसायचं. शांत डोक्याने विचार करायचा मग आपल्याला त्यातून बाहेर पडण्याचा काहीतरी मार्ग नक्कीच सुचतो.''

''खरं आहे. घाबरून उपयोग नाही,'' बबू मनात म्हणाला.

''आधी शांत व्हायचं मग मार्ग सापडतो!''






दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## द्वैतकल्पनानिरसन

**ज्योतिर्मय साहित्य**

विज्ञानपंडितांनी निर्माण केलेली विलक्षण सुक्ष्म यंत्रेआपल्या दैनंदिन जीवनात घडून आणलेल्या सुधारणा कल्पनेच्या सामर्थ्यवान विचाराने सिध्द झालेल्या आहेत. समर्थ सांगतात की विनाकारण वेळ वाया घालवण्यापेक्षा माणसाने तो वेळ स्वतःच्या सुधारणेकडे वळवावी. जग बदलण्याची वाट पहात बसण्यापेक्षा स्वतः बदल करावेत.माणूस बदलण्यासाठी त्याचे मन बदलणे गरजेचे आहे. मन कल्पनाप्रधान असल्याने कल्पनांची रचना व तऱ्हा बदलली की मनही आपोआपच बदलते. ''मी देहच आहे'' हा मोठेपणा नाकारून ''मी आत्माच आहे ''असे समजून मानवी मनातील द्वेत आणि अद्वैत, ज्ञान आणि अज्ञान, ब्रम्ह आणि माया हे सर्व मनच निर्माण करते. शुध्द सात्त्विकता अंगी बाणवून जीवन जगता आले पाहिजे. माणसाचे मन चंचल असते ते संकल्पही करते व विकल्पही करते.

संकल्प म्हणजे काय?

मन जेव्हां ब्रम्हाची कल्पना करते तेव्हा ती खरी असते तिला संकल्प म्हणतात.

विकल्प म्हणजे काय?


मन जेव्हा मायेची कल्पना करते तेव्हा ती खोटी असते तिला विकल्प म्हणतात. ब्रम्ह आणि माया, संकल्प आणि विकल्प या दोन्हींचा मेळ मन चंचल असल्याने बसत नाही.

मनाचा मी पणा केव्हा गळून पडतो

साक्षीपणा, चैतन्य, सत्ता हे गुण माया ब्रम्हाच्या माथी मारते. ब्रम्हावर या गुणांचा आरोप करते. घटाकाश भांड्याच्या आकाराचे आकाश.

मठाकाश-घरातील आकाश.

महदाकाश म्हणजे विश्वातील आकाश असे तीन भेद आहेत. त्याच प्रमाणे माया खरी मानली म्हणजे ब्रम्हावर आरोप गुणांचा करतात. मूळ ब्रम्हामध्ये ते गुण नाहीत. पण जोपर्यंत मायेचे खरेपण वाटते तोपर्यंत ब्रम्हाला साक्षित्व असते. ''मी साक्षी पणाने पहातो'' असे द्वैत असते. पण माया,अविद्या दोन्हींचा निरास झाला म्हणजे द्वैतही नाहीसे होते. साक्षीत्वपण नाहीसे होते. मन व्यापक बनता बनता सर्व साक्षी बनते. ते जेव्हा उन्मन होते तेव्हा तुर्यावस्था मावळते. ''मी देह आहे ''हा अहंभाव नाहीसा होतो.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## ठेवतां रामावर एक विश्वास । त्यालाच समाधान हमखास ॥

**ज्योतिर्मय साहित्य** हात माझ्यामागें हें ठेवावें मनांत । व्यवहार सांभाळून वागावें जगांत ।। दुष्ट मतीची उत्पत्ति । ही दुर्जनाची संगति ।। भावें धरितां रघुपति । सर्व संकटें दूर जाती ।। भोगांत नामाचें न व्हावें विस्मरण । याकरितां राखावें समाधान ।। देहाचे भोग देहाचे माथीं । त्याची न मानावी खंती ।। विश्वास ठेवावा रामापायीं । सर्व कांहीं चांगलें होऊन जाई ।। आपला भार घेतला रामानें । विश्वासानें सत्य मानणें खरें ।। सद्गुरुआज्ञा प्रमाण । हेंच साधनांतील साधन जाण ।। जो जो प्रसंग येईल जैसा । तो तो सान्निध्य जाणावें रघुपतीचा ।। शरीर आहे दों दिवसांचें । वायां न जाऊं द्यावें साचें ।। रामकृपा त्याजसी होई। ज्यानें नांव ठेवलें हृदयीं ।। मुखीं नाम, हृदयीं राम । त्यानें जोडला आत्माराम ।। गुरुचरणीं ठेवावा विश्वास। निर्भयता त्यानें येत खास ।। जें जें होणार तें होतच जातें। विनाकारण मन कष्टी होतें ।। माझे प्रपंचीं नाहीं सुखदुःख । असें ज्यानें जाणलें चित्तीं । त्याचा संसार सुखाचा झाला निश्चितीं । ज्यानें दिली रामाची संगति। त्याचा विषाद न मानावा चित्तीं ।। उद्विग्नतेचें कारण । साधनाचें विस्मरण । मुख्य करितां रामाची भक्ति । आपोआप गळते विषयाची आसक्ति ।।

भगवंतावर ठेवावा पूर्ण विश्वास । तो करतो तेंच हिताचें मानावें खास ।। अंतकाळीं भगवंताचें नाम। त्याला करीन माझेसमान । हें भगवंताचें वचन जाण । त्याच्यावर ठेवावा विश्वास ।। म्हणून रामावांचून जगतीं । आतां माझा असें न म्हणावें चित्तीं ।। दुःख जाण्यास उपाय सांगती साधुजन। आसक्तीत न गुंतावें आपण ।। म्हणून, सर्व कांहीं करावें । पण मीपणानें कोठें न राहावें ।। याला उपाय एकच जाण । सदा राखावें रामाचें अनुसंधान । कशांतहि नसावें आपलेपण ।। परिस्थिति निर्माण झाली । कालांतरानें विलय पावली ।। म्हणून न मानावें कशाचें सुखदुःख । सर्वांत रामाची जाणीव एक ।। वाचेनें मौन, हृदयांत रामाचें प्रेम । अखंड रामाचें अनुसंधान । याहून दुजें नाहीं साधन । हें मानावें प्रमाण ।। ठेवतां रामावर एक विश्वास। त्यालाच समाधान हमखास । म्हणून रामाचा चित्तीं ठेवावा विश्वास । वळण द्यावें व्यवहारास ।। साधन असें कांहीं असावें । ज्यानें साध्याला सहज पोहोचावें ।। राम म्हणावा आपला । साधनांतील साधनाचा लाभ झाला ।। शुद्ध असावें आचरण । पवित्र करावें मन ।। नामस्मरण ज्याच्या मुखीं । रामकृपें तोच एक सुखी ।। एकच देव, एकच गुरु, एकच साधन । यांवर ठेवतां विश्वास । कृपा करील ईश्वर खास।।

जेव्हां मनासकट देह केला अर्पण । मग मरणाच्या भयाचे काय कारण ।।




अभंग २६

रोमराजवेळा । कीं वेणी एकवळा ।
दावि निराळा । उदरामध्यें ॥
हृदय निर्मळ । तेथें ध्येय ध्यान केवळ ।
वरि चरणकमळ । द्विजोत्तम ।
वैजयंति माळा । शोभतसे गळां ।
उभलेनि वक्षस्थळा । उभारली ॥
सरळ बाहुदंड । न कळे कानवड ।
अंगोळिया धडफुड । खुणा दावितो गे माये ॥६॥
ऐसा खुणा दावितसे एका । तंव दावी अनेका ।
अंगोळिया देखा । दशावतारीं ॥
नखाची मंडणी । तेथें तेज तारांगणी ।
होत असे प्रवणी । त्रिमिर द्वैत ॥
शुक्लपक्ष । कीं अंतरीं लक्ष ।
सारुनियां साक्ष । दृशदिसवीं ॥
एकाएकीं संचरे कीं माजिघरीं दुसरे ।
स्वयें एकसरे । नवल चोज गे माये ॥७॥
तेथ सानुसान स्वर । दोहिलें अंबर ।
हास्यवदन सुंदर । पावया छंदें ॥
निमासुरा नेटका । न कळे ब्रह्मादिका ।
वेधुनि गोपिका । मोहियलें जग ॥
समदृष्टी नासापुटीं । नेत्रद्वय निघाले भेटी ।
रविशशि कोटी । लोपले तेथें ॥
मना मारुनि मेळा । कीं कुंडलें शोभे किळा ।
तेथें जाला एकवळा । योगिजना गे माये ॥८॥
व्योमींचा मणीं । तया तळीं सहस्त्रफणी ।
तो लाधला निर्वाणी । आराधितां ॥
शेष वर्णिता श्रमला । ह्मणोनि शरण आला ।
शयन होऊनि ठेला । तया तळीं ॥
ऐसी सुमन सेजा । कीं मवाळपण बरविया वोजा ।
तेथें रातली रमा भाजा । न निवडे कैंही ॥
ऐसा झाला एकवळा । शेष म्हणे दैव आलें फ़ळा ।
आतां पाहेल सुनीळा । कायें सेज माजी ॥९॥
ऐसयाचें ध्यान । जरि हें न करी मन ।
तरीच पतन । जन्ममरण ॥
चिंता साठीं फ़ेडी । कीं उभारुनियां गुढी ।
स्वयें सुखाचिया आवडी । कां सांडितासी ॥
आतां करूं पाहे ध्यान । तरि सहजेंचि उन्मन ।
म्हणोनि समाधान । होय जीवा ॥
तीर्थ व्रत तप दान । जरी न करी हें मन ।
तरि सहजचि साधन । गोपिनाथु ॥१०॥
तीर्था जातां सायासी । तूं काय एक देसि ।
म्हणोनि स्तविलासी । बहुतांपरी ॥
तंव परापश्यंती मध्यमावेखरी ।
या युक्तिनो बोलवेसी ॥
निवृत्ति म्हणे लीळा । विश्वव्यापक निराळा ।
पाहे उघडा डोळां परब्रह्म ॥
ज्ञानदेवा मीपणीं । निवृत्ति ऐक्य चरणीं ।
सरो दुजेपणीं । हांव जीवा ॥११॥

क्रमशः......



आरोग्य संजीवनी

## उडीद खाण्याचे आयुर्वेदिक फायदे

**ज्योतिर्मय साहित्य**

पचन सुधारते

उडीद डाळ खाण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ते तुमची पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. यामध्ये आहारातील फायबरचे प्रमाण जास्त असते. हे पचनसंस्थेचे चांगले कार्य करण्यास मदत करते आणि मल नियमित करते तसेच विषारी द्रव्ये बाहेर काढण्यासाठी पेरिस्टॅलिसिस (आतड्यांची हालचाल) उत्तेजित करते.

शरीरातील ऊर्जा वाढते.

काळ्या उडीद डाळीमध्ये भरपूर लोह असते. त्यामुळे तुमच्या शरीरातील ऊर्जा पातळी वाढण्यास मदत होते. लोह हे तुमच्या शरीरासाठी अत्यंत महत्वाचे पोषक तत्व आहे कारण ते लाल रक्तपेशींच्या निर्मितीस मदत करते. या पेशी तुमच्या सर्व अवयवांना ऑक्सिजन वाहून नेण्यासाठी जबाबदार असतात. जेव्हा तुमच्या शरीरातील सर्व अवयवांना पुरेसा ऑक्सिजन मिळतो तेव्हा शरीरातील उर्जेची पातळी सुधारते.

खनिज घनता सुधारते.

काळ्या उडीद डाळीमध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम, लोह आणि कॅल्शियम इत्यादी आवश्यक खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. हे सर्व पोषक आपल्या हाडांमधील खनिज घनता वाढवण्यास मदत करतात. हे खूप महत्वाचे आहे कारण जसजसे आपले वय वाढतो तसतशी आपली हाडे कमकुवत होत जातात. त्यामुळे आपण ऑस्टिओपोरोसिससारख्या हाडांशी संबंधित आजारांना बळी पडतो.

मधुमेहामध्ये फायदेशीर राहते

जर तुम्हाला मधुमेह असेल तर तुमच्या आहारात उडीद डाळ ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत होते. यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे ते इंसुलिन सोडण्याचे नियमन करून तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते.

हृदय निरोगी ठेवते.

काळी उडीद डाळ तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी देखील उत्तम आहे कारण त्यात फायबर, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम जास्त प्रमाणात असते, त्यामुळे ते तुमच्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी प्रणालीला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. हे तुमच्या कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित करते, जे तुमच्या हृदयासाठी उत्तम आहे.


संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

फार पूर्वी पासून केळीचे झाड, पाने, खोड सहित आपल्या जीवनात एक मोलाचे स्थान आहे. आज आपण केळीच्या पानांचा ज्यूस पिण्याचे एकापेक्षा एक फायदे पाहू, नियमित घेतल्याने शरीरातील अनेक समस्या लगेच होतील दूर.....

साऊथ इंडियामध्ये केळीच्या पानांवर जेवण करण्याची फार जुनी पद्धत आहे. असं सांगितलं जातं की, केळीच्या पानावर जेवण केल्याने व्यक्तीचं आरोग्य चांगलं राहतं. केळीच्या पानांमध्ये पॉलीफ ेनॉल, अँटी ऑक्सिडेंट्सचं प्रमाण भरपूर असतं. या दोन्ही गोष्टी आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. पण अनेकांना केळीच्या पानांचा ज्यूस पिण्याचे फायदे माहीत नसतील.

तुम्हाला वाचून आश्चर्य वाटेल की, आजकाल अनेक प्रकारच्या लोशनमध्ये केळीच्या पानांचा रस मिक्स केला जातो. कारण केळीच्या पानांमधील पोषक तत्वांनी यूव्ही किरणांमुळे त्वचेचं होणारं नुकसान टाळता येतं. तसेच याचे आरोग्यालाही अनेक फायदे मिळतात. तेच आज आपण जाणून घेणार आहोत.

**(क्रमशः)**



## लघु बोधकथा

### सोन्याचा मुकुट आणि चांदीचे पाय

एका मोठ्या शहरात भगवान श्रीविष्णुचे मोठे मंदिर होते. रोज अनेक भक्त त्या मंदिरात दर्शनासाठी येत असत. हळूहळू मंदिराची ख्याती वाढू लागली, भक्तांची गर्दी होऊ लागली, मंदिराचा विस्तार होऊ लागला मग काही लोकांनी ठरविले
भगवान विष्णुला एक सोन्याचा मुकुट करावा. त्यासाठी निधी गोळा करण्याचे ठरविले. गावाच्या बाजूलाच एक अनाथ, अपंग मुलांचा आश्रम होता. त्या आश्रमालाही गावातील काही लोक दानधर्म करत. गावात भिकुशेठ नावाचे एक श्रीमंत सावकार राहात होते.
भिकुशेट आपल्या पैशातून, नफ्यातून काही वाटा हा दानधर्मासाठी वापरत असत. भक्तमंडळींना वाटले की भिकुशेटसारखा दिलदार मनाचा माणूस आपल्याला मदत करेल. सगळे मिळून भिकुशेटकडे गेले. भक्तमंडळीना आपल्या पेढीवर आलेले पाहून भिकुशेटला मोठा आनंद झाला. त्यांनी भक्तांचा मोठा आदरसत्कार केला. लोकांनी भगवान श्रीविष्णुसाठी सोन्याचा मुकुट करण्याचे सांगितले व भिकुशेटकडून मदतीची मागणी केली. यावर भिकुशेट म्हणाले,''मंडळी मी तुमच्या कामात काही मदत करू शकत नाही कारण मी विष्णुला सोन्याचा मुकुट करण्यापेक्षा चांदीचे पाय करण्याचा विचार करत आहे.'' लोक म्हणाले आम्हाला निश्चित काय ते खरे सांगा. भिकुशेट सर्वांना दोन दिवसांनी येण्यासाठी सांगितले. दोन दिवस निघुन गेले. लोक पुन्हा भिकुशेटच्या पेढीवर गेले असता भिकुशेटच्या शेजारी एक लहान मुलगा बसला होता.
भिकुशेटने त्या मुलाला उठायला सांगितले. त्या मुलाला दोन्ही पाय नव्हते. मग भिकुशेटच्या नोकराने एका पेटीतून दोन वस्तू काढल्या ते कृत्रिम पाय होते ते त्या नोकराने त्या अपंग मुलाला व्यवस्थितपणे बसविले. मुलगा हळूहळू चालू लागला. भिकुशेट म्हणाले,'' भक्तांनो, या मुलाचे नाव विष्णु, हा अपंग असून अनाथ आहे. याला पाय नव्हते म्हणून मी शहरातून हे पाय विकत आणले असून तो आता हिंडू फिरू शकतो. त्या विष्णुला सोन्याचा मुकुटाचा तसा फारसा उपयोग नव्हता पण या विष्णुला पायांची गरज होती. मी याला दिलेले कृत्रिम पाय याच्या दृष्टीने सोन्याचांदीपेक्षा जास्त महत्वाचे आहेत.''
तात्पर्य - मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा

# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

**ज्योतिर्मय साहित्य**



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

आज २३ जानेवारी, हिंदू हृदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची १०० वि जयंती. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी मार्मिक हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले शिवसेना यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या जयंती दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

# शंकरराव भेलके महाविद्यालयाचे पालखुर्द येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर उत्साहात संपन्न



**ज्योतिर्मय साहित्य**

नरसापूर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव बेलगे महाविद्यालय, नसरापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''शाश्वत विकासासाठी युवक पाणलोट क्षेत्र व पडीक जमिनी व्यवस्थापन'' या विषयांतर्गत १३ ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर पालखुर्द, तालुका राजगड, जिल्हा पुणे येथे आयोजित करण्यात आले होते.

या विशेष शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी श्रमदानासह विविध समाजोपयोगी व पर्यावरणपूरक उपक्रम राबवले. गाव स्वच्छता मोहीम, राजगड किल्ला परिसराची स्वच्छता, प्लास्टिक कचरा संकलन, वनराई बंधारा (गुंजवणी नदीवर) उभारणी, पडीक जमिनी व्यवस्थापन, प्रभात फेरीद्वारे जनजागृती, पथनाट्य सादरीकरण, कृषी पर्यटन क्षेत्र भेट तसेच विविध विषयांवरील व्याख्याने आयोजित करण्यात आली.

शिबिरादरम्यान शाश्वत शेती, राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका, लेह ते लडाख प्रवास अनुभव, नंदनवन कृषी पर्यटन आणि राजगड किल्ला संवर्धन यासारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. संक्रांतीच्या दिवशी गावातील महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम घेण्यात आला. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. श्री. योगेश दरडीघे ( पोलिस पाटील पाल.खु. ), श्री शिवाजी दरडीघे, श्री पांडुरंग दरडीगे यांनी या शिबिरासाठी विशेष मदत केली.

शिबिराचे उद्घाटन अमृतेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव लाटे यांनी केले, तर समारोप प्रसंगी पाली गावचे सरपंच सौ. निता किरण खाटपे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ. जगदीश शेवते, प्रा. दयानंद जाधवर, प्रा. वैष्णवी कोंडे व प्रा. अंकिता महांगरे, अभिषेक मोरे तसेच सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हे शिबिर यशस्वीपणे पार पाडले. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धनाची भावना व श्रमप्रतिष्ठा अधिक दृढ झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# सीमासुरक्षा दलात श्रीयश अभियांत्रिकीच्या अंकीत म्हस्के यांची निवड

**ज्योतिर्मय साहित्य**



छत्रपती संभाजीनगर : येथील श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचा विद्यार्थी अंकीत म्हस्के यांची केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या सीमासुरक्षा दलात अधिकारी पदावर निवड झाली आहे. अंकीत यांनी स्टाफ सिलेक्शन कमिशन जनरल ड्युटी अंतर्गत घेण्यात आलेली लेखी परीक्षा तसेच शारीरिक चाचणी यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. ते महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या युनिटचे गेल्या तीन वर्षांपासून कॅडेट असून, राष्ट्रीय छात्र सेनेचे 'सी' प्रमाणपत्र त्यांना या निवडीसाठी उपयुक्त ठरले. महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून त्यांना शारीरिक प्रशिक्षणासोबतच अर्धसैनिक दलांच्या निवड प्रक्रियेविषयी सखोल मार्गदर्शन वर्ग देण्यात आले. या सातत्यपूर्ण प्रशिक्षण, शिस्तबद्ध जीवनशैली आणि कठोर परिश्रमांच्या जोरावर त्यांना हे महत्त्वपूर्ण यश प्राप्त झाले. या यशाबद्दल राष्ट्रीय छात्र सेनेचे सहयोगी अधिकारी प्रा. ब्रिजभूषण शुक्ला तसेच श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. बसवराज मंगरुळे यांनी अंकीत म्हस्के यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.







# शिव कांची - कांचिपुरम

**ज्योतिर्मय साहित्य**

२) कामाक्षी अम्मान् कोवील

कामाक्षी मातेचे हे मंदिर एक प्रमुख शक्तीपीठ आहे. या मंदिराचा उल्लेख स्कंदपुराण शिवपुराण इत्यादी मध्ये आढळून येतो. सतीचा देह त्यागानंतर भगवान विष्णूच्या चक्राने तिचे बावन तुकडे करण्यात आले. आकाश मार्गाने भ्रमण करणाऱ्या शिवांच्या हातून हे तुकडे भारतभर सर्वत्र विखुरल्या गेले. यापैकी कांचीपुरम येथे या मंदिराच्या परिसरात सतीचा नाभी भाग पडला. म्हणून यास नाभी पिठम किंवा ओध्याना पिठम असे म्हणतात. इथे मातेची मूर्ती चतुर्भुज रूपात आहे. ती पद्मासनात बसली आहे. या मंदिरा लगतच पंचगंगा तीर्थ आहे.

आख्यायिका

हे मंदिर एकांबरेश्वर मंदिराच्या जवळच आहे. याबद्दलची आख्यायिका अशी आहे की, पार्वतीने शिवाच्या प्राप्तीसाठी इथे उग्र तपश्चर्या केली. त्या काळात ती उग्र रूपात होती. (कालिका रुप) मातेच्या या उग्र रूपा मुळे इतर देवता भयभीत झाल्या. व त्यांनी महादेवांना प्रार्थना केली. महादेवांच्या आज्ञेनुसार आद्य शंकराचार्य यांनी मंदिरात श्री यंत्राची प्रतिष्ठापना केली. व शाक्त पंथाची मजबूत मुहूर्तमेढ इथे रोवली गेली.या श्री यंत्राच्या प्रभावामुळे मातेचे उग्ररूप मावळून ती शांत व भक्तवत्सल झाली. ती कणवाळू व भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारी झाली. यामुळे हिला कामाक्षी हे नाव पडले. ते कामना पूर्ण करणारे आहे. म्हणून सर्व भक्तांना ती प्रिय झाली.

दुर्वासा ऋषींनी इथे तपश्चर्या केली. सौभाग्य चिंतामणी या ग्रंथात लिहिल्याप्रमाणे इथे मातेची सात प्रकारे पूजा होते. संतान प्राप्ती व्हावी म्हणून कामाक्षी मातेची आराधना लोक भक्ती भावाने करतात. ज्या ज्या इच्छा आहेत त्या त्या मातेस बोलून दाखवतात, व विनवणी करतात की यातून सोडवणूक कर. इथे एका मुक्या व्यक्तीस स्वर प्राप्ती झाली अशी कथा आहे. आयुष्यात कधीही बोलू न शकणारा माणूस इथे येऊन मनोमन करुणा भाकू लागला. माता द्रवली व तिने एका क्षणात त्याला वाचा दिली. या व्यक्तीने पाचशे श्लोकांचे एक स्तोत्र रचले.

गर्भगृहाच्या मध्ये एक चांदीचा खांब आहे. त्यावर एक छिद्र आहे. ते देवीच्या नाभीचे प्रतिनिधित्व करते. या खांबास संतान प्राप्तीसाठी भक्त पूजन करतात याशिवाय मंदिरातील विग्रहाच्या नजीक एक योनीच्या आकाराचे श्री चक्र आहे. शास्त्राप्रमाणे या श्री चक्राच्या शीर्षस्थानी देवी विराजमान आहे. या श्री चक्रात आठ कोण आहेत. यावर आठ ठिकाणी देवी विराजमान आहेत. या मंदिराचा सभामंडप गायत्री मंडप ओळखला जातो त्यात २४ स्तंभ आहेत प्रत्येक स्तंभ गायत्रीचे एक अक्षराचे अलंकृत केलेला आहे नवरात्रीच्या काळात मातेचे विशेष अनुष्ठान असते. दुर्गा सप्तशती पाठ, हवन कुमकुम अर्चन,ललिता सहस्त्रनाम पठन इत्यादी धार्मिक विधी विशेषत्वाने या काळात होतात.


३) कैलास नाथर मंदिर

कांचीपुरम येथे असलेले सर्वात जुने शिवमंदिर म्हणजे कैलास नाथ मंदिर.

हे शिवमंदिर पल्लव राजांनी इसवी सन ७०० ते ७२८ यादरम्यान बांधले. या काळी राजा नरसिंह वर्मन दुसरा याने हे मंदिर उभारले. यानंतर त्याचा पुत्र याने त्यात काही भर घातली. हे मंदिर पल्लव द्रविड संस्कृतीचा उत्कृष्ट नमुना आहे. या मंदिरा वरूनच प्रेरणा घेऊन कदाचित बृहदेश्वर मंदिर तंजावर याचे निर्माण झाले असावे. या मंदिरात मुख्य मंदिराच्या भोवती प्रदक्षिणा मार्गावर ५८ छोटी छोटी मंदिरे किंवा देव कोष्टके आहेत. ही छोटी मंदिरे म्हणजे कैलास पर्वता भोवती असलेल्या शिव गणांचे प्रतीक माणल्या जातात. या मंदिरात शिवाची अनेक रूपे आहेत. जसे नटराज, अर्धनारीश्वर, गज संहार मूर्ती, अंधकासुर वध, त्रिपुरांतक, पूर्ण तांडव मूर्ती हेही दिसतात. हे मंदिर वाळूच्या दगडातून बनवलेले आहे. इथे शिव तपस्वी योगी आणि कैलासवासी या रूपात पुजले जातात. गर्भगृहाच्या भिंतीवर शिवांच्या विविध लीला कोरलेल्या आहेत. मंदिरात अजूनही पल्लव काळातील भित्ती चित्रे आहेत. ही सर्वात प्राचीन धार्मिक चित्रकला मानली जाते. मुख्य मंदिराच्या परिक्रमा मार्गात अरुंद,अंधाऱ्या वाटा व गुप्त कोनाडे आहेत. भक्तांचा असा विश्वास आहे की, या मार्गातून परिक्रमा केल्याने अहंकाराचा नाश होतो, आंतरिक साधना घडते तसेच पाप क्षालन ही होते. अशी परिक्रमा करताना आत्मचिंतन घडते. हे अंधारातून प्रकाशाकडे जाणे, ही मोक्ष मार्गाची प्रतिकात्मक यात्रा मांडली जाते. **(क्रमशः)**

# समाधान

**ज्योतिर्मय साहित्य**



सदा गोड बोलावे, नम्रपणे
सर्व लोकप्रिय व्हावे,
सुबोध गुरूचा मानावा
कधी कोणा न दुखवावे

समाधान हा विषय एवढा गहन आहे की तत्वज्ञानी व तत्त्वचिंतक यावर आपले विचार अनेक प्रकारचे उदाहरणं देऊन समाजाला सन्मार्गाच्या रस्त्यावर घेऊन जातात.

ज्या ज्या वेळी समाजामध्ये अराजकता माजते समाज हा संकटाच्या खोल दरीत खितपत पडतो, सामाजिक, कौटुंबिक सर्वत्र बेबंदशाहीला ऊत येतो तेव्हा तेव्हा समाधानाची आणि सर्व समावेशक तत्वचिंतनाची समाजाला गरज असते.

रामायण, महाभारत, भगवत गीता, धर्म व धर्माला कर्तव्याची जोड देण्यासाठी अनेक लोकजागृतीचे कार्यक्रम करून समाज सुसंस्कृत आणि सुदृढ होण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत.



सौ उज्वला धर्माधिकारी
पुणे. 75882 35646

मित्रांनो समाधान काही तुम्हाला बाजारात जाऊन घेता येणार नाही. किंवा आता आपण सगळेजण आधुनिक भारताचे सुज्ञ नागरिक आहोत. तेव्हा समाधान कोणत्याही फुडमॉल मध्ये, किंवा मोठमोठ्या पंचतारांकित हॉटेलमध्ये तसेच कोणत्याही देशात मिळणार नाही. जसे की मला समाधान हवे आहे. माझ्याकडे बक्कळ पैसा आहे चला मी विमानाचे तिकिट काढते किंवा एक विमान खरेदी करते सगळ्या जगात फिरून येते आणि कुठे समाधान विकत मिळेल तेथून घेऊन येते.

असं समाधान तुम्हाला जगाच्या पाठीवर कुठेच मिळणार नाही.

त्यासाठी आपल्याला एक करावे लागेल की आपले पाय सदैव जमीनीवर असायला हवेत. कुणाची संपत्ती पाहून आपल्याकडे नाही म्हणून खेद वाटून घेऊ नये. पण ती मिळवण्यासाठी प्रयत्न जरूर करावा.

**(क्रमशः)**

ज्योतिर्मय

Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999


विक्रम वेताळ आणि डायरेक्ट मार्केटिंग
वेताळा, तू सुरुवातीला माझ्याबद्दल व माझ्या सातत्य बद्दल जे कौतुक केलेच ना तसेच सातत्य शेयर बाजार वा म्युच्युअल फंडात गुंतवणूक करताना असायला हवे.
गुंतवणुकीतील सातत्य व स्थितप्रज्ञता अंगी बाणवल्यास व बाजारावर निष्ठा ठेवल्यास तू म्हणतो तसे चांगला परतावा मिळवून धनवान होण्यापासून माझ्या राज्यातील गुंतवणूकदाराला कोणीच अडवू शकत नाही.
येवढे बोलुन विक्रम थांबला.
तेव्हा प्रेत आतील वेताळ म्हणाला विक्रमा तुझा शेअर मार्केटच्या ज्ञानाचे मला नेहमीच कौतुक वाटत आले आहे. तुझे प्रसारमाध्यमांबद्दल चे निरूपण ही मला खरे तर निरुत्तर करून गेले. पण म्हणत आणखी काही प्रश्नांची गर्दी होते आहे. पण ते पुढच्यावेळी आता मी जातो.
असे म्हणून वेताळ पुन्हा झाडावर जाऊन लटकला


आम्ही तुमचे पुस्तक प्रकाशित करू!
ज्योतिर्मय प्रकाशन
प्रत्येक लेखकाचं एकच स्वप्न असते ते म्हणजे माझ्या कवितांचे, लेखांचे, कथांचे, कादंबरीचे पुस्तकात रूपांतर व्हावे व ते जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहोचावे, मग हे स्वप्न आम्ही पूर्ण करू.
उत्कृष्ट छपाई, साजेसे मुखपृष्ठ अगदी कमी वेळेत व अगदी बिनचूक.
मग वाट कसली बघता तुमचे स्वप्न पूर्ण करा ज्योतिर्मय प्रकाशन सोबत.
लगेच कामाला लागा व आम्हाला खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करा.
ज्योतिर्मय प्रकाशन
▪ पुणे ▪ छ. संभाजीनगर
संपर्क : 7743 81 8559

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ

साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ


ऑनलाईन औषधोपचार

आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# निवेदन - साहित्य संस्था वाचवा - विदर्भ साहित्य संघ वाचवा

ज्योतिर्मय साहित्य

विदर्भ साहित्य संघाची निवडणूक टाळली जाणे व सर्व संबंधितांनी एकत्र बसून मार्ग काढणे विदर्भ साहित्य संघ या संस्थेचा किमान सुमारे १५ लाखांचा निवडणुकीवर होणारा प्रचंड खर्च वाचवून तो पैसा संस्थेच्या कार्यावर खर्च होईल हे बघणे संस्था हिताचे असल्याने अजूनही अतिशय आवश्यक आहे, ही बाब कोणीच विचारात घेताना दिसत नाही.

केवळ स्वलाभकेंद्री आणि आपल्या व्यक्तिगत आकांक्षापूर्तीचे साधन म्हणून सेवाभावी,स्वयंसेवी संस्थेचा वापर हा तिचे रूपांतर एखादे सत्ताकेंद्र असलेल्या पण मुळात तसे नसलेल्या राजकीय स्वरूपाच्या संस्थेत यातून होण्याची शक्यता प्रथमच निर्माण झाली आहे.

ते अशा प्रकृतीच्या संस्थांसाठी इष्ट नक्कीच नाही. जिल्हा परिषद, ग्राम पंचायत, नगरपालिका निवडणुकीप्रमाणेच प्रत्येक संस्थेकडे बघणे व केवळ निवडणूक म्हणजेच लोकशाही एवढी मर्यादित बाळबोध व्याख्या लोकशाहीची करणे म्हणजेच फक्त लोकशाही नव्हे.

लोकशाहीत विवेक ही देखील महत्वाची बाब असते.

विदर्भ साहित्य संघ ही प्रामुख्याने भाषा, साहित्य, संस्कृतीशी संबंधित गांभीर्याने कार्य करण्याकरता निर्माण झालेली सेवाव्रती, स्वयंसेवी लेखक, साहित्यिक अशा समर्पित कार्यकर्त्यांची संस्था आहे. केवळ तथाकथित साहित्यप्रेमी नावावर कोणीही चालवण्यासाठी निर्माण झालेली ही संस्था नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

तसेच ती व्यापारी, राजकारणी, प्रशासक, राजकीय नेते यांनी देखील चालवण्याची संस्था नाही.

सदस्यांनी देखील हे लक्षात घेऊनच त्या पद्धतीने ती टिकेल व तशीच वाङ्मयीन प्रतिमा, प्रतिष्ठा असणारी माणसे तिथे असतील हे बघणे आवश्यक आहे.


त्याचप्रमाणे विदर्भ साहित्य संघ ही भाषा, साहित्य, संस्कृती,अभिरूची, अभिव्यक्ती, वाङ्मयीन प्रतिभा याचे जतन, संवर्धन करण्यासाठी शंभर वर्षांपूर्वी स्थापली गेलेली संस्था आहे.त्यातील संघ हा शब्द संघ भावनेचा,समूह भावनेचा निदर्शक असून तो पाली शब्द हा संघभावनेच्या, समर्पित व समूह भावनेने कार्य करण्याच्या अर्थाचा द्योतक आहे. कोणत्याही विशिष्टच विचारसरणीच्या संघाचा तो द्योतक नाही.हे विदर्भ साहित्य संघाच्या इतिहासात नमूद आहे, वेळोवेळी अनेकांनी आपल्या लेखांमधून हा इतिहास ज्ञात करून दिला आहे.हे देखील संबंधितांनी लक्षात ठेवावे.

कार्यकारी मंडळात पूर्वीही वेगवेगळ्या विचारसरणीचे थोर, जुने, नवे असे कार्यकर्ते होते.

मात्र ते आपापल्या वैचारिक निष्ठा वा आप आपल्या विचारसरणीच्याच तेवढ्या संघ भावनेने नव्हते तर ते बाजुला ठेवून संस्थेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठीच तेवढे राबत होते.

कोणत्याही विशिष्टच विचारसरणीने, राजकारण्याने वा शासनाने कोणत्याही विभागीय साहित्य संस्थेत, विदर्भ साहित्य संघात, कधीही थेट हस्तक्षेप, जो आज खुलेपणाने आमंत्रित केला जातो आहे, राज्यात इतरत्र होताना दिसतो आहे तसा आजवर गेल्या शंभर वर्षात केलेला नव्हता.

आज विदर्भ साहित्य संघ व अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या तत्सम विभागीय साहित्य संस्थांसमोर अशा एखाद्या विशिष्टच विचारसरणीच्या दावणीला, राजकारण्यांच्या दावणीला, राज्यकर्त्यांच्या दावणीला संस्था बांधली जाण्याचे, शासनाच्या हस्तक्षेपाचे आव्हान उभे आहे.



तसेच लेखक असणाऱ्या, प्रतिभावान असणाऱ्या, साहित्य संस्थेला आवश्यक वाङ्मयीन दिशादर्शक नेतृत्वाच्या जागी तथाकथित प्रशासकीयतेचे स्वयंघोषित कौतुक करणारे व अवाङ्मयीन असणाऱ्या नेतृत्वाने संस्था ताब्यात घेण्याचे धोके उभे आहेत.

विदर्भ साहित्य संघाच्या व तत्सम विभागीय साहित्य संस्थांच्या मूळ प्रकृतीला व स्वायत्ततेला गंभीर धोका त्यामुळे निर्माण झाला आहे.साहित्य संस्था या राजकारणी, अवाङ्मयीन नेतृत्व आणि विशिष्टच विचारसरणी लादू बघणाऱ्यांपासून, व्यापाऱ्यांपासून वाचवायला हव्यात.

या पार्श्वभूमीवर गेली ५५ वर्षे केवळ व्यापक मराठी हित आणि विदर्भ साहित्य संघाचेही व्यापक संस्थात्मक हित ज्यात असेल अशीच, सर्व अस्मितांच्या सर्व प्रवाहांना संस्थेशी जोडून घेणारी सर्वसमावेशक भूमिका विदर्भ साहित्य संघ, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळात व संस्थेबाहेरही सर्वत्र घेतलले व मराठीच्या भल्यासाठी आणि मराठीच्या व्यापक हितासाठी ४० संस्था व ६० मान्यवरांच्या चळवळीचे प्रमुख संयोजक, मराठीला अभिजात दर्जा मिळवण्याचा संघर्ष करत तो मिळवून देण्यात यशस्वी झालेले, मराठी विद्यापीठ स्थापनेचा सतत पाठपुरावा करत ते राज्याकडून स्थापन करून घेणे, दहावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा कायदा करून घेणे, मराठी भाषा विकास प्राधिकरण कायदा करून शासनाने स्थापावे यासाठी प्रयत्न सुरू ठेवलेले, महाराष्ट्राला प्रथमच मराठी भाषा धोरण देणाऱ्या राज्य भाषा सल्लागार समितीत त्यासाठी प्रमुख भूमिका निभावणारे, शासनाने सांस्कृतिक धोरणाचे पुनरीक्षणाचा पाठपुरावा करत ते पुनरीक्षण करवून घेणारे, महाराष्ट्रातील सुमारे २५० सांस्कृतिक संस्थांची आघाडी उभारून राज्याच्या सांस्कृतिक विकासासाठी,राज्य सांस्कृतिक विकास मंडळ आणि विभागीय सांस्कृतिक विकास मंडळे राज्याने स्थापन करावीत या साठी शासनाकडे पाठपुरावा करणारे,हिंदी आणि तिसरी भाषा सक्तीचे शासन निर्णय मागे घ्यायला शासनाला बाध्य करणारे या व अशा अनेक भाषा, साहित्य, संस्कृतीविषयक बाबींच्या चळवळीचे एक अध्वर्यू , अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी संस्थेच्या निवडणुकीत व्यक्तिगत आकांक्षा बाळगण्याऐवजी संस्थात्मक आकांक्षा बाळगाव्या असे आवाहन अनेकदा केले होते.

मात्र अद्याप तरी त्या दिशेने ठोस पावले टाकली जाणे बाकी आहे.

दरम्यान प्रख्यात ज्येष्ठ कवी इ.मो. नारनवरे यांनी

या पार्श्वभूमीवरच डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी

विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदासाठी होऊ घातलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केलेले आवाहन केवळ भावनिक म्हणून दुर्लक्षित केले जाऊ नये. श्रीपाद कर्ता साहित्यिक विचारवंत आहे. तब्बल तीन दशकांहून अधिक काळ वि.सा.संघाचा उपाध्यक्ष म्हणून धुरा वाहणारा श्रीपाद भालचंद्र

जोशी विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष म्हणून मनोनित होणे विदर्भ साहित्य संघाच्या तमाम सभासदांचाही गौरव वाढविणारे ठरावे,असे म्हटले आहे.

म्हणूनच आम्ही, विदर्भ साहित्य संघाला सर्वप्रवाही, सर्वसमावेशक वळण लावण्यात आणि ती अपेक्षित अशी सुमारे ४० वर्षे टिकवून धरण्यात, तिला प्रतिष्ठा व ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्यात, विदर्भ साहित्य संघाचे सुमारे तीस वर्षे उपाध्यक्ष राहिलेले व या संस्था चालनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या ज्येष्ठ कवी, लेखक, साहित्यिक, पत्रकार, संपादक, संवाद-माध्यम तज्ज्ञ असणारे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे पूर्वाध्यक्ष डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी यांना या संस्थेला पूर्वीप्रमाणे सुस्थापित करून देण्यासाठी अध्यक्षपदाचे उमेदवार होण्यासाठी अनुमती मागितली व ती त्यांनी दिली याचा आम्हाला आनंद आहे. त्यांचे दिशादर्शक वाङ्ममीन, सांस्कृतिक नेतृत्व विदर्भ साहित्य संघाला पुनः एकदा गमावली गेलेली प्रतिष्ठा प्राप्त करून देईल व संस्थेतील हरवलेला संवाद पुनःस्थापित करेल याची आम्हाला खात्री आहे.

श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासोबत त्यांच्या पॅनेलमध्ये असणाऱ्या संपूर्ण २२ कार्यकारी मंडळ सदस्यांसाठी अर्ज अगोदरच अर्ज दाखल झाले असून त्यातील नावे ९ फ ेब्रुवारी नंतर जाहीर केली जाणार आहेत.

आज त्यांचे आम्ही सूचक, अनुमोदक त्यांच्यासह त्यांचा अध्यक्षपदासाठीचा अर्ज दाखल करण्यासाठी इथे हजर आहोत.


आपले : सूचक-डॉ शरद निंबाळकर, विनोद देशमुख. अनुमोदक : मेघना वाहोकार, वसंत वाहोकार, प्रकाश दुलेवाले, दादाकांत धनविजय, ज्ञानेश्वर वांढरे

# गोष्ट राजा राणीची

ज्योतिर्मय साहित्य

या मंडळी बसा, आज तुम्हाला एक गोष्ट सांगतो. आटपाट नगर होतं, एक राजा होता व त्याची एक राणी होती. थांबा, तुम्हांला वाटत असेल की लहान मुलांची गोष्ट सांगतो की काय ? नाही, काळजी करू नका लहान मुलांची गोष्ट नाही सांगत आहे, पण गोष्टीची सुरवात पूर्वी अशीच असायची म्हणून तसं म्हंटलं. तर गोष्ट आहे राजा राणीची, हो तिच भातुकलीच्या खेळामधली. आता भातुकली खेळायच त्यांचं वय राहिलेलं नाही, आता मोठे झालेत ते. किती मोठे झालेत म्हणून काय विचारता? निसर्गाने त्याचे रंग दाखवायला सुरुवात केली आहे, म्हणजे राजाच्या डोक्यावरची थोडी कौलं उडाली आहेत, चष्मा लागलेला आहे वगैरे. राणीने देखील हल्ली हेअर डाय करायचं सोडलं आहे, त्यामुळे चंदेरी रंग पटकन डोळ्यात भरतो, चालताना गुडघ्यावर ताण पडतो आहे हे लक्षात येतय. तुम्ही पण ना गंमतच करता राव, आता आपण एवढे मोठे झाल्यावर ते किती मोठे झाले असतील याचा तुम्हाला अंदाज यायला हवा होता.

असो बाकी तपशिलात जात नाही मी, राजा आता निवृत्त झाला आहे. घरात दोघंजणच असतात. आता पूर्वीसारखी परिस्थिती राहिलेली नाही, कोण आहे रे तिकडे म्हंटल्यावर लगेच सेवक धावून यायला किंवा प्रधानाने जी हुजूर म्हणून हजर व्हायला. पूर्वीचा राजमहाल काही राहिला नाही आहे, राजाने आता ३ बिएचकेचा फ्लॅट घेतला आहे. मुलंबाळं आहेत का म्हणून काय विचारता, आहेत तर राजाराणीचा राजकुमार तिकडे ट्रंप काकांच्या गावाला म्हणजे अमेरिकेत असतो, आणि राजकुमारी असते ऑस्ट्रेलियाला. दोघांचिही लग्न झालेली आहेत त्यांना युवराज व युवराज्ञी आहेत. सगळे आपापल्या विश्वात व्यस्त असतात, सगळं काही छान चाललेले आहे.



शेखर देशपांडे

संपर्क : 98817 34580

राजाराणीचा फ्लॅट आहे बाराव्या मजल्यावर आणि विशेष म्हणजे समोर आणखी कुठला टॉवर अजून तरी उभा राहिलेला नसल्यामुळे त्यांच्या बाल्कनीतून सुर्यास्त फार छान दिसतो. बहुतेक संध्याकाळी राजाराणी बाल्कनीत आरामखुर्चीत बसून कॉफी घेत गप्पा मारत सुर्यास्त बघत बसतात. असेच एक दिवस ते दोघं बसलेले असताना राजा त्याच्या जवळ ठेवलेल्या रेडिओ एफएम चालू करतो आणि गाणं लागतं या चिमण्यांनो परत फिरा रे घराकडे आपुल्या, तिन्हीसांजा जाहल्या.



झटक्यात राणीचा पडलेला चेहरा पाहून राजा लगेच एफएमचं केंद्र बदलतो, आता गाण्याच्या ओळी कानावर पडतात का राणीच्या डोळ्यात तेव्हा दाटून आले पाणी.

राजा म्हणतो अरे बापरे आज ह्या गाण्यांनी पण काय वेळ साधली आहे, असं म्हणून तो रेडिओ बंद करून टाकतो. थोडा वेळ निरव शांतता, दोघंही निशब्दपणे बसून राहतात.

राजा उठून दिवे लावतो व राणीला म्हणतो उठा राणी सरकार आता युवराजांचा व्हिडिओ कॉल येईल, हॅलो ग्रँड पा अँड ग्रॅनी हाऊ आर यु ? बाय गुड नाईट. तेव्हा आपल्याला फ्रेश होऊन यायला हवं. राणी थोडा वेळ तशीच बसून राहते शुन्यात नजर लावून. मग उठते व बेसिनवर जाऊन तोंड धुऊन येते. देवापाशी दिवा लावून मग जाते किचनमधे अन्न गरम करून झाल्यावर राजाला हाक मारते. दोघंही जेवायला बसतात, राजा आपला काहीतरी गंमतीच सांगून वातावरण जरा हलकं करायचा प्रयत्न करत असतो. जेवण झाल्यावर त्यांची नेहमीची सिरीयल बघतात, नंतर राणी म्हणते चला आता झोपा. सकाळी ऑस्ट्रेलियाच्या चिमण्यांचा व्हिडिओ कॉल येईल गुड मॉर्निंग ग्रँड पा अँड ग्रॅनी तेव्हा आपली झोप झालेली बरं.

काय म्हणता ? गोष्टीतल्या राजाराणी सारखं एक जोडपं तुमच्या सोसायटीत पण राहतं, तुमच्या परिचयातले असल्यासारखे वाटतात, तुमच्या नात्यातील पण असेच राजाराणी सारखे आहेत ? शक्य आहे, आपल्या आजुबाजुलाच असतात असे राजाराणी पण आपलं कुठे लक्ष असतं त्यांच्याकडे ?

( टिप : ह्या गोष्टीतील पात्र व प्रसंग काल्पनिक आहेत, जर काही साधर्म्य आढळले तर तो निव्वळ योगायोग समजावा.)

****

# सांस्कृतिक अस्मितेचे चैतन्य-सोमनाथ स्वाभिमान पर्व

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

राष्ट्रीय अस्मितेची अभिव्यक्ती सोमनाथ स्वाभिमान पर्व उत्सवाच्या निमित्ताने देशभरात जी लोक जागृती घडून आली ती राष्ट्रीय अस्मितेच्या अभिव्यक्तीचे एक माध्यम म्हणून प्रभावीपणे प्रकट झाली आहे भारताच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाचे संघर्षमय आणि तेवढेच तेजस्वी आणि यशस्वी रूप या जनअभिव्यक्तीच्या द्वारे प्रकट झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी ज्या दूरदृष्टीने या उत्सवाचे आयोजन केले त्यासाठी ते खरोखरच अभिनंदन आज पात्र आहेत. या उत्सवाचे वर्णन ज्ञान विज्ञान आणि संस्कृती याचा त्रिवेणी संगम असे करावे लागेल. हा भारतीय स्थापत्य वास्तुकला आणि ज्ञानपरंपरेचा तर गौरव आहेच शिवाय स्वातंत्र्योत्तर काळात भारताने विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात जी स्पृहणीय कामगिरी केली आहे. त्या कामगिरीचेही दर्शन ड्रोन प्रदर्शनाने अभिव्यक्त करण्यात आले आहे. तसेच या मंदिराच्या व्यवस्थापनात ८० टक्के महिलांचा सहभाग असून एखाद्या धार्मिक स्थळाचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्यात महिलांचा लक्षणीय सहभाग हे सुद्धा या नव्या कामगिरीचे एक लक्षणीय वैशिष्ट्य आहे. गेल्या दहा वर्षात संस्कृती आणि विज्ञान यामध्ये समन्वय साधून भारत आणि आपल्या राष्ट्रीय अस्मितेचे कसे दर्शन घडविले आहे याची ही एक अभूतपूर्व अशी अभिव्यक्ती म्हटली पाहिजे. सामाजिक आर्थिक आणि वैज्ञानिक प्रगती बरोबरच आपण आपल्या सांस्कृतिक अस्मितेच्या मानबिंदूकडे दुर्लक्ष करता कामा नये कारण आपल्या सांस्कृतिक राष्ट्रवादाचा भक्कम पाया या मानबिंदूंनी घातला आहे हे आपण सातत्याने लक्षात घेऊन पुढील वाटचाल समर्थपणे केली पाहिजे.


प्रेरक मंत्र सामर्थ्य

सोमनाथ महापर्वाच्या समापन समारंभात पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी केलेल्या भाषणातील प्रेरक मंत्र सामर्थ्याचा अन्वयार्थ लक्षात घेण्यासारखा आहे त्यांचे संपूर्ण भाषण हे सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या भक्कम पायाभरणीसाठी एक प्रेरक मंत्र सामर्थ्य देणारे आहे.

या भाषणाचे असे विश्लेषण केले असता तीन प्रमुख मुद्दे समोर येतात ते असे की सोमनाथ वर मेहमूद गजनीने केलेले पहिले आक्रमण असो की त्यानंतर झालेली दोन आक्रमणे असोत ती परतावून लावण्यासाठी भारतीयांनी केलेला संघर्ष आणि त्यावेळी दिलेली प्राणांची आहुती पाहता या मंदिराच्या अस्मितेचे रक्षण करण्यासाठी भारतीयांनी दाखविलेला असिमीत त्याग हा भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने देण्यासारखा आहे. दुसरे म्हणजे आक्रमक आणि मंदिराच्या कला व स्थापत्याचा नाश केल्यानंतर लगेचच



पुन्हा भारतीयांनी या मंदिराची तेवढीच कला व स्थापत्याची जपणूक करत नव्याने उभारणी केली आहे तिसरे म्हणजे या मंदिराच्या इतिहासामध्ये राष्ट्रीय पुनरुत्थानाचे अद्भुत तत्व सामावलेले आहे हे तत्त्वज्ञान आधुनिक काळात राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला नवे चैतन्य सामर्थ्य आणि नवी ऊर्जा देणारे आहे ही गोष्ट प्रामुख्याने अधोरेखित केली पाहिजे.




सोमनाथ मंदिर हे भारताच्या अखंड आत्म्याचे प्रतीक आहे तसेच प्रत्येक सामान्य माणसाच्या अभिव्यक्तीतून भारताच्या संस्कृतीची लवचिकता प्रकट होते, विविध कालखंडात झालेले हल्ले परतवून लावून लोकांनी आपल्या लवचिकतेचा जिवंत पुरावा मागे ठेवला आहे. या मंदिरासाठी शतकांशतके संघर्ष करून प्राणांची आहुती देणाऱ्या पराक्रमी भारतीयांच्या त्याग आणि समर्पणाची स्मृती सदैव जिवंत ठेवली पाहिजे कारण हे मंदिर त्यांच्या शतकांशतके बजावलेल्या कर्तृत्वाचे अस्मितेचे प्रतीक आहे त्यांच्या पराक्रमाचे अभूतपूर्व दर्शन घडविण्यासाठी १०८ घोड्यांची शौर्य यात्रा काढण्यात आली. हे मोठे औचित्य आहे पंतप्रधानांनी गुलाम मानसिकतेवर प्रहार केला आणि असा संदेश दिला की गतकालीन इतिहासातून बोध घेऊन आपण पुढे वाटचाल केली पाहिजे. या मंदिराच्या महत्त्वाकडे दुर्लक्षित करता कामा नये अशा विचारसरणीचा पराभव करण्याचे त्यांनी केलेले आवाहन अर्थपूर्ण आहे. सोमनाथ अमृताची कल्पना मांडताना त्याने अमरत्वाचा संदेश दिला, जो प्रत्येक भारतीयाला प्रगतीचा नवा मार्ग दाखविणारा आहे शाश्वत देवत्वाचा दीप स्तंभ म्हणून हे मंदिर अखंड प्रकाश देण्याचे कार्य करत आहे. सोमनाथ ही एक अखंड अमृतमय कल्पना आहे आणि शाश्वत दृष्टीने विचार करता १००० वर्षात पिढ्यानपिढ्या शाश्वत देवत्वाचा संदेश हे मंदिर देत आहे. नदी अखंडपणे वाहते आणि वाळूच्या कणा बरोबर मागे सोन्याचे कण ठेवते त्याप्रमाणे भारतीय संस्कृतीचा प्रवाह पवित्र आणि मंगलमय आहे या सांस्कृतिक प्रवाहाचे चैतन्यदायी रूप म्हणजेच सोमनाथ मंदिर होय. भारतीय संस्कृतीचे सत्य शिव आणि सुंदर रूप गंगेच्या प्रवाहासारखे अखंडपणे प्रतिबिंबित करण्याचे श्रेय सोमनाथ मंदिराकडे जाते, त्यामुळे खरोखरच हा भारतीय संस्कृतीचा आत्मा सोमराज सोमनाथच्या रूपाने अमर झाला आहे. या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की सोमनाथ मंदिराचे गेल्या १००० वर्षातील भारतीय इतिहासातील स्थान हे प्रमोद आदराचे आणि तेवढेच सन्मानाचे राहिले आहे त्यामुळे भारतीय इतिहासातील हा मंगल दिव्य आणि अमृतमय प्रसंग सदैव नवी ऊर्जा देत राहील सोमनाथ स्वाभिमान पर्व हा भारतीय इतिहासातील विजयी परंपरांचा ओंकार नाद म्हटला पाहिजे. याप्रसंगी पंतप्रधानांनी मंत्रमुग्ध करणारे विचार मांडले आणि त्यातून राष्ट्रीयत्वाचा नवा सिद्धांत प्रतिपादन केला आनंददायी अनुभूतीचा नवा प्रत्यय त्यांनी घडविला. हर हर महादेव आणि जय सोमनाथ या घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला सोमनाथ परिसरातील मातीचा प्रत्येक कण आणि इतिहासाचा क्षण आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची कहाणी सांगत आहे. या मंदिराच्या रक्षणासाठी आणि नवनिर्माणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या त्या वीरांचे स्मरण करण्याचा हा पवित्र उत्सव होता, त्याचे पावित्र्य जतन करणे हेच प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे सांस्कृतिक वैभव आतून विकासाचा संदेश घेऊन नवभारताची जडणघडण होत आहे आणि २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सोमनाथ मंदिर नवी ऊर्जा देत आहे. गरिबी दूर करून विज्ञानाची कास धरून आपली चैतन्य शक्ती जागृत ठेवण्याचा संदेश सोमनाथ स्वाभिमान पर्वाने दिला आहे. प्रत्येक आव्हानाला समर्थपणे सामोरे जाऊन आपले ध्येय साध्य करणे हीच आपली खरी सत्वपरीक्षा असणार आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559